पुणे जिल्हा परीषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग माध्यमिक
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-६/ ६१ /१०
पुणे दिनांक १३/१०/२०१०

प्रति,

सचिव / मुख्याध्यापक,
सेवागीरी शिक्षण संस्था,
भोसरी पुणे - ३९.

विषय - प्राथमिक विभागाकडील इ.५ ते ७ चे वर्ग माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन काढणेबाबत

संदर्भ - १ मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.माध्य- ३(१५) प्रते ७ पुवि १५२९८/१७/२०१०-११.
२. आपले कडील पत्र क्र.एस.एस.एस./२१/२०१० दि. १६/०९/२०१०.
३. ------

उपरोक्त संदर्भिय विषयावये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील संदर्भ क्र.१ अवये आपले विदयालयातील प्राथमिक विभागाकडील इ.५ ते ७ चे वर्ग माध्यमिक विभागाकडे ऑगस्ट-२०१०. पासुन वर्ग करण्यास परवागी देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.२ अवये प्राथमिक विभागाकडील शिक्षक माध्यमिक विभागाकडे वर्ग झालेने आपण सदर कर्मचा-यांचे वेतन माध्यमिक विभागाकडुन काढणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव विचारात घेता माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या खालील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन माध्यमिक विभागाकडुन ऑक्टो : १० पासुन अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.नं | शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-याचे नाव | पदानाम | शैक्षणिक पात्रता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | सौ. काकडे वंदना ग. | उपशिक्षक | B.Com, D.Ed, B.Ed. | 9300-34800 |
| २ | सौ. डेंबिड सुलोचना प्र. | —"— | S.S.C. D.Ed. | 9300-34800 |
| ३ | सौ. मोरे धनवंती वि. | —"— | B.S.C. D.Ed. | 9300-34800 |
| ४ | सौ. पवार सुनंदा वि. | —"— | S.S.C. D.Ed. | 5200-20,200 |
| ५ | सौ. बांगर नम्रता प्र. | —"— | S.S.C. D.Ed. | 5200-20,200 |
| ६ | श्री सांगळे सुभाष ब. | —"— | H.S.C. D.Ed. | 5200-20,200 |
| ७ | श्री पवार मिलींद धों. | —"— | H.S.C. D.Ed. | 5200-20,200 |
| ८ | सौ. पळसकर रत्नमाला रा. | —"— | H.S.C. D.Ed. | 5200-20,200 |
| ९ | | | | |
| १० | | | | |

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद

प्रत - अधिक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक पुणे.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./६जी/२०००/२००१
पुणे, दि- २३/२/२०००

प्रति,

सचिव,

सेवागिरी शिक्षण संस्था, भोसरी.

पुणे ३९

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता देणेबाबत. २०००/२००१

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या जिजामाता माध्यमिक विद्यालय, भोसरी या माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी च्या वर्गास मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र.माध्य-३[१४]/नपाशा/मान्यता/पुणे/ ९९/२००८ दि. २७/१/२००० अन्वये परवानगी देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेत जून २००० पासून इ. ९ वीच्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

१] ग्रंथालयातील ग्रंथसंख्या वाढवावी.
२] माध्य. शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
३] अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर असावा.
४] कर्मचाऱ्यांची सेवानोंद पुस्तके अद्यायावत ठेवावीत.
५]
६]

Recived copy 22/09/2009 I.No 36

मा. शि. प्र. यांची
मान्य टिपणी.

J.N.H——
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,

१. मुख्याध्यापक,

जिजामाता माध्यमिक विद्यालय, भोसरी.

पुणे ३९.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा/
२००१-२००२
पुणे. दि. २८/५/२००१

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

जिजामाता हायस्कूल, मोसरी
पुणे ३९.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन २००१ -२००२
जिजामाता हायस्कूल, भोसरी ता. जि. पुणे.३९
इ. ६वी, इ. ७वी, इ. ९वी, इ. १०वी.

आपल्या सेवागिरी शिक्षण संस्था, भोसरी या संस्थे-व्दारा संचलित जिजामाता हायस्कूल, भोसरी हया माध्य. शाळेत इ. ८वी/इ. ५वी चा वर्ग [मराठी/इंग्रजी] सुरु करणेस सन ९९-२००० या. शै. वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/३१२३/नमाशा/मान्यता/पुवि/२०९८/९९ दि.२७/१/२०००अन्वये शासन परवानगी मिळालेली आहे. सन २००१ -२००२ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, इ. ७वी, इ. ९वी, इ. १०वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००१ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देण्येत येत आहे. सदर वर्गाच्या वार्षिक तपासणीबाबत आपण संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती —— जि. पुणे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेऊन अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्येत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वीचा नैसर्गिक वाढीने सुरु आहेत अशा माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी आवश्यकती सर्व कागदपत्रा जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

Received on
7/06/2001
I. No.
1

J N H[illegible]
शिक्षणाधिकारी[माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

तात्काळ

जा.क्र.माध्य.३ (१३ ) नमाशा/मान्यता/१०९८
पुवि/९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय,

दिनांक : 27 JAN 2000

प्रति,

सचिव,

तेजागिरी शिक्षण संस्था, भोसरी, पुणे-३९.

**विषय : सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.....**

**संदर्भ : शासन पत्र क्रमांक नमाशा /शिक्षण/मा/६५/ई-४ / माशि-१ दि. १४./१. /२०००**
९९-२०००

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९९ पासून विनाअनुदान तत्वावर/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एसएसएन-१०८८/१६६९ एन, माशि-१, दिनांक १०-२-८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातन खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७) माध्यमिक शाळा संहिता व माराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९) शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

Received on 27/1/2000
I No. 9

१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१३) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

**इतर अटी -**

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरूद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | सेवागिरी शिक्षण संस्था, भोसरी, पुणे-३९ | भोसरी, पुणे-३९. | ८ वी | मराठी<br>[जून ९९ पासून विनाअनुदान तत्वावर मान्यता] |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माधमिक व उच्च माधमिक शिक्षण मंडळांच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देणयाची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्षरित/- शिक्षण उपसंचालक
पुणे, विभाग, पुणे - १

करितापर वि. उ. सं. यांची
सही करे

**प्रतिलिपी -**

१) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पुणे करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा, तसेच संस्थांविरुद्ध तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

३) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना सविनय सादर